Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052 (UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015 Available online at www.aygrt.isrj.org

# ‘स्वामी रामानंद तीर्थ यांचे शैक्षणिक विचार व योगदान’

**बी.टी. मोताळे[1] , पी.यू. नेरपगार[2]**

[1]राज्यशास्त्र विभाग , स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी,
ता. साक्री,जि. धुळे(महाराष्ट्र)
[2]राज्यशास्त्र विभाग,सि.गो.पाटील महाविद्यालय साक्री,ता. साक्री,जि. धुळे (महाराष्ट्र)

**सारांश –** आधुनिक महाराष्ट्राचा पाया घालण्याचे महत्वपूर्ण कार्य महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. समाजसेवकांनी विशेषतः सामाजिक व शैक्षणिक बाबतीत केले. याप्रमाणे स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपल्या राजकीय योगदानाद्वारे केवळ हैद्राबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरणच केले नाही तर प्रतिकुल परिस्थितीत देखील मागासलेल्या हैद्राबाद संस्थानी प्रदेशात विधायक कार्याला प्रारंभ केला. त्यांच्या विधायक कार्यात शैक्षणिक योगदान महत्वपूर्ण आहे. प्रस्तूत संशोधन लेखात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शैक्षणिक योगदानावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :**

- **संशोधनाची उदिष्ट्ये :-**

1) स्वामी रामत्नंद तीर्थ यांच्या शैक्षणिक योगदानाचा आढावा घेणे.
2) स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे.
3) स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शैक्षणिक योगदान व विचारांचा प्रसार करणे.
4) स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शिक्षणविचारातुन लोकशाही मुल्यांचा प्रसार करणे.

- **संशोधनाची गृहितके :-**

1) स्वामी रामानंद तीर्थ यांचे शैक्षणिक विचार आधुनिक काळाशी सुसंगत आहेत.

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052 (UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015 Available online at www.aygrt.isrj.org

2) स्वामी रामानंद तीर्थ यांनी शिक्षणाद्वारे लोकशाही मुल्यांचा प्रसार केला.
3) स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्त्री -पुरुष समानतेचा स्विकार व प्रसार केला.
4) स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शैक्षणिक विचार व योगदानातुन इतरांना प्रेरणा मिळाली.

● **संशोधन पध्दती :-**

प्रस्तूत विषयावर संशोधन करतांना ग्रंथालयीन, ऐतिहासिक व विशेषणात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेण्यात आलेला आहे.

● **स्वामी रामानंद तीर्थ - एक कर्मयोगी शिक्षणतज्ञ :-**

स्वामी रामानंद तीर्थ यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भूमिका पार पाडलेली आहे. हिप्परगा (जि. उस्मानाबाद) येथे कुलकर्णी बंधूनी स्थापन केलेल्या शाळेत स्वामीजींनी महत्वपुर्ण भूमिका पार पाडलेली आहे. अनंतराव कुलकर्णी यांनी हिप्परगा शाळेत येण्याविषयी केलेल्या विनंतीनुसार "जुन 1929 रोजी खेडगीकरांनी या शाळेच्या मुख्याध्यापक पदाची सुत्रे हाती घेतली."[1] खेडगीकर म्हणजेच स्वामीजी हिप्परगा येथे आल्यानंतर त्यांनी या राष्ट्रीय शाळेच्या मुख्याध्यापक पदाची धुरा सांभाळली. या शाळेतून निजामी राजवटीच्या विरोधात चळवळ उभी करण्यासाठी जी एक नवीन पिढी घडवली जात होती त्यासंदर्भात स्वामीजी म्हणतात की, " ही संस्था म्हणजे स्फोटक मानवी सामुग्री निर्माण करण्याचा एक जणू मोठा कारखानाच बनली होती."[2] हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेचा प्रकल्प म्हणजे हैद्राबाद संस्थानाच्या शैक्षणिक इतिहासातील एक महत्वपुर्ण घटना होय. कारण या शाळेच्या माध्यमातून संस्थानातील भविष्यातील चळवळ सक्रीय करण्या-या नागरिकांची निर्मिती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात होता. स्वामीजींच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली संस्थानातील निजामी राजवटीच्या विरोधात या शाळेने परिस्थिती निर्माण केली.

हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेचा शैक्षणिक प्रकल्प विविध कारणांनी बंद पडल्यानंतर स्वामीजी मोमीनाबाद (अंबाजोगाई जि.बीड) येथील योगेश्वरी विद्यालयात आपल्या सहका-यांसह आले आणि शैक्षणिक योगदान अखंडपणे सुरुच ठेवले. " श्री नारायणराव जोशी व अन्य कार्यकर्त्यानी स्वामीजींना अंबाजोगाईस येण्यास विनंती केली आणि स्वामीजी बाबासाहेब परांजपेसह अंबाजोगाईला दाखल झाले. (1935) व्यवस्थापकांनी शाळेची सर्व धुरा स्वामीजींच्या शीरावर टाकली. स्वामीजींना आणखी एक शैक्षणिक कार्य करण्याची संधी लाभली."[3] स्वामीजींनी स्वतःला विधायक कार्य व राष्ट्रीय कार्यासाठी वाहून घेतले. शिक्षण क्षेत्राविषयी त्यांना विशेष रुची असल्यामुळे अंबाजोगाई येथील योगेश्वरी नुतन विद्यालयात येऊन या विद्यालयाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी स्विकारली योगेश्वरी नुतन विद्यालयाचा विस्तार करण्यात, विद्यार्थिसंख्या वाढविण्यात स्वामीजींचे बहूमोल योगदान होते. येथील शैक्षणिक कार्याला स्वामीजींनी आपले तन-मन-धन अर्पण केलेले होते.

स्वामीजींनी हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होण्यापुर्वी तसेच विलिन झाल्यानंतर देखील शैक्षणिक कार्यावर विशेष भर दिलेला आहे. " स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वामीजींनी भारतीय समाजाला योग्य दिशा देण्यासाठी, त्यांच्यात राष्ट्रनिष्ठा, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि मानवतावाद यासारखी उदात्त मुल्य वृध्दिंगत करण्यासाठी आपले लक्ष शिक्षणक्षेत्रावर केंद्रित करण्याचा निर्धार केला"[4] हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्यानंतर स्वामीजींनी राजकीय कार्यक्षेत्राबरोबरच विधायक कार्याकडे विशेषतः शिक्षणाचा प्रसार करण्याकडे अधिक लक्ष केंद्रित केले. शिक्षणाच्या माध्यमातून

भारतीय समाजाला उदात्त मुल्यांना अनुसरुन योग्य दिशा देण्यात महत्वाची भुमिका पार पाडली. " 1950 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटी तर्फे मिलिंद महाविद्यालय सुरु केले तर त्याच वर्षी स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेड एज्यूकेशन सोसायटीतर्फे नांदेड शहरात पीपल्स महाविद्यालय सुरु केले. या दोन्ही महाविद्यालयाचा शुभारंभ 16 जून 1950 मध्ये झाला."[5] समाजोन्नतीसाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे ओळखुन स्वामी रामानंद तीर्थ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकाचवेळी आणि एकाच नावाने उच्च शिक्षण देण्या-या संस्था वा महाविद्यालयाची स्थापना करुन विशेषतः हैद्राबाद संस्थानी प्रदेशात उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

पीपल्स महाविद्यालयाच्या स्थापनेमागील भूमिका आणि उद्देश स्पष्ट करतांना स्वामीजी म्हणतात की, "पीपल्स कॉलेज हे आपल्या नावाप्रमाणे सर्वसामान्य लोकांचे कॉलेज असेल. त्याचे उद्दिष्ट त्यांच्या नावातच आहे. ते तेथे शिक्षण घेण्या-या विद्यार्थ्यांच्या मनात लोकसेवा व लोककल्याणाच्या प्रेरणा निर्माण करील. स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून विविध क्षेत्रात वावरतांना ते गरीब लोकांविषयी आपल्या मनात कणव बाळगतील. दलित,पददलित आणि शोषित वर्गाची सेवा हेच त्यांच्या समोरचे उद्दिष्ट असेल. टागोरांच्या शब्दात सांगावयाचे झाले तर हे महाविद्यालय 'एक लहानसे घरटे' असेल की, ज्यात पिलांना उद्याच्या जगात लोकसेवेची भावना मनात बाळगून उडण्या- बागडण्यासाठी ममतेच्या हातांनी सकस पण मऊ अन्न भरविले जाईल."[6] स्वामीजींच्या या मताद्वारे त्यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोण स्पष्ट होतो. भारतीय लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी स्वामीजींनी उच्च शिक्षणावर अधिक भर दिला. स्वामीजींनी उच्च शिक्षणाच्या प्रसाराचा भाग म्हणून, "1956 साली अंबाजोगाई येथे कॉलेज काढण्याच्यादृष्टीने पु. स्वामीजींनी संस्थेसमोर प्रस्ताव मांडला. बदलत्या राष्ट्रजीवनात औद्योगीकरण महत्वाचे. म्हणून संस्थेने, 1956 साली विज्ञान महाविद्यालय उघडले."[7] स्वामीजींनी नांदेड येथे स्थापन केलेल्या पीपल्स महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर अंबाजोगाई येथे त्यांनी उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतूने विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. "स्वामीजींनी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना व्हावी यासाठी प्रयत्न केले आणि 1958 मध्ये औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली."[8] मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी स्वामीजींची भूमिका महत्वपुर्ण आहे. त्यांनी तत्कालिन राज्य व केंद्र सरकारकडे मागणी लावून धरल्यामुळे सरकारने मराठवाडा विभागात विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी एका समितीची नियुक्ती केली. या समितीच्या शिफारशीनुसार 23 ऑगस्ट 1958 रोजी औरंगाबाद येथे 'मराठवाडा विद्यापीठ' (सध्याचे डॉ. बा.आं.म.विद्यापीठ औरंगाबाद) स्थापन करण्यात आले. स्वामी रामतीर्थ शांति महाविद्यालय स्थापन करण्यापाठीमागे स्वामीजींचा असा विचार होता की, "समाजसेवा करु इच्छिणा-या तरुणांना एकत्र करुन त्यांच्यावर अध्यात्मक व विज्ञान यांचे संस्कार करावेत. तसे साहित्य निर्माण करावे. प्रशिक्षणासाठी एक नियमित अभ्यासक्रम आखावा आणि देशभर अशी केंद्रे वाढवावीत."[9] विज्ञान आणि अध्यात्माचा समन्वय साधून देशभरातील तरुणांना एकत्रीत करुन त्यांच्यातील उपलब्ध शक्तींना अधिक प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या महाविद्यालयाच्या माध्यमातून स्वामीजींनी केला. स्वामीजींनी पितापुरम येथे स्थापन केलेल्या शांति महाविद्यालयावरुन स्पष्ट होते की, स्वामीजींचा शिक्षणविचार वैश्विक मानवतावादाकडे झुकलेला आहे. "स्वामीजींच्या प्रेरणेतुन मराठवाड्यात ठिकठिकाणी अनेक विद्यालये निघाली. व्यक्तीच्या विकासातुनच समाज घडतो, राष्ट्र घडते हा सिध्दांत ते नेहमी मांडीत असत. चारित्र्य निर्मितीवर त्यांचा भर होता. मराठवाड्यात उच्च शिक्षणाचा जो प्रसार झाला त्याचे श्रेय स्वामी रामानंद तीर्थ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महान व्यक्तींकडे जाते."[10] स्वामीजींच्या शैक्षणिक विचार व भूमिकेचा मोठा प्रभाव मराठवाड्यातील शिक्षण विषयक चळवळींवर स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात पडलेला दिसून येतो. केवळ मराठवाड्यातच नव्हे तर कर्नाटक, हैद्राबाद विभागात देखील स्वामीजींच्या प्रेरणेने विविध शिक्षण संस्था स्थापन झाल्यामुळे शिक्षण प्रसाराचा वेग वाढला.

"मुलतः शिक्षण ही संकल्पना अचल व स्थिर स्वरुपाची नसुन काळानुरुप राजकीय, सामाजिक गरजांनुसार शिक्षणाची उद्दिष्ट्ये बदलतात अशी स्वामी रामांनद तीर्थांची धारणा होती." [11] बदलता काळ व परिस्थितीनुसार समाजाच्या बदलत्या गरजांना न्याय देण्यासाठी 'शिक्षण' कालसापेक्ष असावे, असा मुलभूत शिक्षण विचार स्वामीजींनी प्रतिपादन केला. "स्वतः आनंदाने जगून इतरांना आनंदाने जगवते ते खरे शिक्षण यावर स्वामीजींचा अढळ विश्वास होता."[12] ज्या शिक्षणामुळे व्यक्ती सुसंस्कारीत होते, तिला जीवन जगण्याची कला प्राप्त होते, तेच शिक्षण अर्थपुर्ण असल्याचे स्वामीजी स्पष्ट करतात. " सर्वांसाठी शिक्षण, समतेसाठी शिक्षण , लोककल्याणासाठी शिक्षण हाच विचार सातत्याने स्वामीजींच्या मनात येत होता."[13] स्वामीजींचा 'शिक्षण' संकल्पनेविषयीचा दृष्टीकोण व्यापक होता. सर्वांच्या कल्याणासाठी तसेच संपूर्ण समाजाची उभारणी 'समता' या तत्वावर करण्यासाठी स्वामीजींनी शिक्षणप्रसाराची आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे. त्यांचा हा विचार आज आधुनिक काळातदेखील प्रासंगिक आहे.

स्वामीजींच्या मते, " शिक्षण हे खरे तर एक अदभूत रसायन आहे. ज्ञान, मूल्ये, संस्कार आणि सभोवतालचे सांस्कृतिक व सामाजिक पर्यावरण अशा घटकातून हे रसायन तयार होते. लहान वयात आणि तारुण्यात जे विद्यार्थ्यांच्या मनात व हृदयात ओतले गेले तर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होतो. जीवनातील आव्हाने पेलण्याचे बौध्दिक व नैतिक सामर्थ्य त्यांना मिळते." [14] स्वामीजींनी शिक्षणाची तुलना रसायनाशी केलेली आहे. ज्याप्रमाणे वेगवेगळ्या घटकांच्या मिश्रणातुन एक अनोखे रसायन निर्माण होते त्याप्रमाणेच ज्ञान, मूल्ये, संस्कार व सांस्कृतिक-सामाजिक पर्यावरण इ. च्या मिश्रणातुन 'शिक्षण' हे रसायन निर्माण होते. या रसायनामुळे व्यक्तीमध्ये जीवनापुढील आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य निर्माण होते असे स्वामीजींचे ठाम मत होते. " शिक्षण हेच समाजातील सर्व वाईट गोष्टींवर रामबाण औषध आहे. दारिद्र्य, अज्ञान आणि इतर दोष नाहिसे करण्यासाठी शिक्षण हिच मोठी शक्ती आहे." [15] यावर स्वामीजींचा पूर्ण विश्वास होता. समाजातील दारिद्र्य व अज्ञानाचे दुष्टचक्र थांबवण्याची शक्ती ही केवळ शिक्षणामध्येच असून शिक्षणाद्वारेच समाजातील सर्व वाईट बाबींचे निराकरण केले जाऊ शकते यावर स्वामीजींचा विश्वास होता. म्हणुनच त्यांनी शिक्षणप्रसारावर अधिक भर दिलेला आहे.

" शिक्षणामध्ये शिक्षक व विद्यार्थी हे दोघेही एकरुप व्हायला पाहिजे. 'ये हृदयीचे ते हृदयी' झाले पाहिजे व असे शिक्षण द्यायचे असेल तर शिक्षण हे मातृभाषेतूनच व्हायला पाहिजे यावर स्वामीजींचा भर होता."[16] शिक्षणप्रक्रियेत शिक्षक व विद्यार्थी हे दोन महत्वाचे केंद्रबिंदु असून हे दोन्ही घटक जोपर्यत परस्परांशी एकरुप होत नाहीत तोपर्यत शिक्षण प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. तसेच जन्मभाषेतून चांगले आकलन होत असल्यामुळे मातृभाषेतूनच शिक्षण देण्याचा आग्रह स्वामीजी धरतात.

स्वामीजींच्या मते, "शिक्षकाने स्वतःच्या व्यवसायात कुशल असून उपयोग नाही, तर त्याने विद्यार्थ्याच्या जीवनात उच्चतर मुल्ये निर्माण केली पाहिजेत."[17] शिक्षक हा केवळ ज्ञानी, उत्तम वक्ताच नसावा तर त्याने विद्यार्थ्यांना जीवन जगण्यासाठी आवश्यक असणा-या विविध मुल्यांची निर्मिती करावी. थोडक्यात शिक्षक हा मुल्याधिष्ठित, संस्कारक्षम, त्यागी, गुणग्राही,अपरिग्रही, मोहमुक्त, चारित्र्यवान, संवेदनशील असण्यावर स्वामीजींनी अधिक भर दिलेला आहे. शिक्षकांनी सतत ज्ञानाच्या बाबतीत अद्ययावत असावे यासंदर्भात स्वामीजी म्हणतात की, "कोणत्याही विषयात बदल होत असतो. तो बदल अद्ययावत माहिती विद्यार्थ्यांपर्यत पोहोचवली पाहिजे, अन्यथा गंजलेला विद्यार्थी तयार कराल."[18] प्रत्येक शिक्षकाने आपल्या विषयातील ज्ञानात उत्तरोत्तर होत असलेली भर जाणुन घेण्यास सदैव तत्पर असले पाहिजे यावर स्वामीजींनी भर दिलेला आहे. " देशाच्या आजच्या परिस्थितीत प्राथमिक शिक्षण हे सार्वत्रिक मोफत व सक्तीचे असले पाहिजे."[19] असे स्वामीजींचे मत होते. स्वामीजींनी जो विचार 19 व्या शतकात मांडला तोच सार्वत्रिक, मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासंदर्भातील कायदा भारत सरकारने 2010 मध्ये केला. यावरुन स्वामीजींची शिक्षणविचारातील दुरदृष्टी तसेच प्रासंगिकता अधिक स्पष्ट होते.

"स्वामीजींच्या शैक्षणिक चळवळीत जातिवादाचे उच्चाटन आणि दीनदलित, बहूजन समाजाची राजकीय, सामाजिक, मानसिक गुलामगिरीतुन मुक्तता या कार्याला प्राधान्यक्रम होता."[20] स्वामीजींनी शिक्षणविचाराद्वारे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती देण्याच्या कार्यात महत्वपूर्ण योगदान दिले.

स्वामीजी धर्मनिरपेक्ष शिक्षणासंदर्भात विद्यार्थ्यांना उद्देशुन म्हणतात की, "तुमची वागणुक धर्मनिरपेक्ष असली पाहिजे. कोणतेही राष्ट्र एखाद्या विशिष्ट धर्माच्या आणि त्या धर्माच्या कैवाराच्या जोरावर फार काळ टिकू शकत नाही."[21] स्वामीजी भारताला भविष्यातील बलशाली राष्ट्र बनवू इच्छित होते. म्हणून त्यांनी धर्मनिरपेक्ष शिक्षणावर भर देऊन भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनवण्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. स्त्री शिक्षणाचे समर्थन करतांना स्वामीजी म्हणतात की, " स्त्री ही चतुर्विध कर्तव्य करु शकते. कन्या,भगिनी , माता, पत्नी म्हणून एका स्त्रीस शिकविले तर एका कुटूंबास शिकविण्यासारखे आहे."[22] शिक्षणाद्वारे स्त्री सुज्ञ, ज्ञानी बनुन राष्ट्राच्या विकासात ती मोलाचे योगदान देऊ शकते यावर स्वामीजींचा विश्वास होता. म्हणूनच राष्ट्राचे कल्याण साधण्यासाठी स्वामीजींनी स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार केला.

स्वामीजींचे शैक्षणिक विचार व योगदान पाहता हे स्पष्ट होते की, तत्कालिन हैद्राबाद संस्थानात शिक्षण क्षेत्रातील खाजगी प्रयत्नांचे श्रेय स्वामीजींचेच आहे. कारण स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक चळवळीवर स्वामीजींच्या शैक्षणिक विचार व भूमिकेचा मोठा प्रभाव पडलेला दिसुन येतो. स्वामीजी हे कृतीशील शिक्षक, मुख्याध्यापक , संस्थाचालक आणि विशेषतः एक कर्मयोगी शिक्षणतज्ञ होते हे त्यांच्या शैक्षणिक विचार व योगदानावरुन स्पष्ट होते.

## ●निष्कर्ष :-

1) स्वामी रामानंद तीर्थ यांचे शैक्षणिक विचार आधुनिक काळातदेखील प्रासंगिक आहेत.
2) स्वामी रामानंद तीर्थ यांनी शैक्षणिक योगदानातून संपूर्ण भारतवर्षात लोकशाही मुल्यांचा प्रसार करुन लोकशाही अधिक दृढ करण्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली.
3) स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्त्री शिक्षणाचे जोरदारपणे समर्थन करुन स्त्री- पुरुष समानतेचा स्विकार व प्रसार केला.
4) स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शैक्षणिक कार्य व योगदानातून अनेकांना शैक्षणिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.
5) स्वामी रामानंद तीर्थ यांनी धर्मनिरपेक्ष शिक्षणाचा प्रसार केला.
6) स्वामी रामानंद तीर्थ हे एक कर्मयोगी, दूरदृष्टी असणारे शिक्षणतज्ञ होते.
7) स्वामी रामानंद तीर्थ यांनी शिक्षणाच्या माध्यमातुन सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती दिली.

## ● संदर्भग्रंथसुची :-

1. राऊत कमलाकर - 2008 - मुक्तिदाता , डोंबिवली, सुमेरु प्रकाशन, पृष्ठ- 32
2. गाठाळ प्राचार्य डॉ. एस.एस. – 2010- 20 व्या शतकातील महाराष्ट्र, औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन, पृष्ठ- 352
3. जोशी प्रा.पी.जी. -2003- स्वामी रामानंद तीर्थ चरित्र- कार्य, नांदेड, पीपल्स कॉलेज,पृष्ठ -13
4. जोशी डॉ. पी.जी. -2009 –मुक्तिगाथा-मुक्तिदाता, नांदेड, क्रिएटीव्ह पब्लिकेशन, पृष्ठ- 113
5. रोडे प्राचार्य डॉ. सोमनाथ -2008- हैद्राबाद मुक्तिलढा आणि स्वामी रामानंद तीर्थ, लातूर, अश्विनी प्रकाशन, पृष्ठ - 103

6. येवतीकर प्राचार्य जयवंत (संपादक) -2000- नांदेड एज्यूकेशन सोसायटी सुवर्ण महोत्सव स्मरणिका , नांदेड सु.म.स.नां.ए. सो. पृष्ठ -105
7. उपरोक्त ,01 पृष्ठ -118
8. चंद्रात्रे (जोशी) डॉ. ललिता -2008- लोकशिक्षक स्वामी रामानंद तीर्थ, नांदेड, आदित्य पब्लिकेशन, पृष्ठ -54
9. देऊळगावकर प्रा. वि.पां. (संपादक) -2001- स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, मुंबई ,म.रा.सा.आ.सं.मं., पृष्ठ- 27 व 28
10. नवले प्रा. सौ. रमा - 1994-95 व 1995-96- प्रवास - वार्षिक अंक, नांदेड, पीपल्स कॉलेज, पृष्ठ -08
11. मेदककर डॉ. प्रकाश -2013- स्वामी रामानंद तीर्थ यांचा शिक्षणविचार , औरंगाबाद, स्वा.रा.ती.सं.सं., पृष्ठ -95
12. उपरोक्त,-08, पृष्ठ -38
13. कित्ता, पृष्ठ -51
14. प्रयाग डॉ. प्रकाश (संपादक) -2003 -दिपस्तंभ (स्मरणिका), पृष्ठ -16
15. धारुरकर डॉ. वि.ल.- 2012- योध्दा कर्मयोगी- गोविंदभाई श्राफ, औरंगाबाद , मराठवाडा जनता विकास परिषद, पृष्ठ -193
16. उपरोक्त, 08, पृष्ठ -112
17. उपरोक्त, 14, पृष्ठ -40
18. कित्ता , पृष्ठ- 53
19. उपरोक्त , 08, पृष्ठ -46
20. उपरोक्त ,11, पृष्ठ -99
21. रोडे डॉ. सोमनाथ -2011- मराठवाड्याचा इतिहास, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स, पृष्ठ- 201
22. **Swami Ramanand Teerth Sanatorium Souvenior, Kinwat Sanatorium Society, kinwat, Page -11**